म्हाडा
MHADA

# कार्यकारी अभियंता / ग-दक्षिण विभाग

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

विश्वराजा दर्शन को ऑ.हौ.सो.,५ मजला, मुक्तांगण शाळेच्या बाजूला, प्रभादेवी (प), मुंबई-४०००१३.

**म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

**अति धोकादायक इमारत**

जा.क्र./का.अ/ ग-द/उअ-२/ ०३ee /२०२६

दिनांक : ०२/०२/२०२६

प्रति,

| | |
|---|---|
| सर्व भाडेकरु / रहिवाशी<br>इ.क्र. २३अे व २३ बी, दत्ता भवन,<br>काशीनाथ धुरु रोड, दादर, मुंबई ४०००२८ | मालक - Shri Vinod Paralkar<br>Shri Anil Paralkar<br>Shri Prakash Paralkar<br>Shri Harish Paralkar ,<br>23/A KASHINATH DHURU STREET<br>Near Kirti College, Dadar (W) MUMBAI 400028<br>(मनपाच्या रजिस्टर नोंदवहीनुसार) |

विषय : उपकर प्राप्त इमारत क्र. २३अे व २३ बी, दत्ता भवन, काशीनाथ धुरु रोड, दादर, मुंबई ४०००२८ (गउ-२७०६(३अे) गउ-२७०६(३बी) ) च्या अति धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना

संदर्भ : १)संरचनात्मक अभियंता श्री पी.जी. येवलेकर यांनी या कार्यालयास दि.०६.०६.२०२५ रोजीचे पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल

२)मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा यांनी पत्र क्र. उमुअ/संगा/५६१२२८६ दि.०५.०६.२०२५

महोदय/महोदया,

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीच्या संरचनात्मक पाहणी करुन अहवाल सादर करण्याकरीता म्हाडाच्या पॅनेलवरील संरचनात्मक अभियंता श्री पी.जी. येवलेकर यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी या कार्यालयास दि. ०६.०६.२०२५ रोजीचे संदर्भाधीन पत्रान्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी **C 1** म्हणजेच (Vacate the building and demolition immediately) अशी नमुद करण्यात आली आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चीती करण्यात आली. सदर जाहीर सुचना इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ चिकटवण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अन्वये आपणास सूचित करण्यात येते की, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासीत करावी. तुमच्या इमारतीचा तळ मजला हा आहे त्या स्थितीत ठेवण्यात येईल तसेच इमारतीमधील अनिवासी, वाणिज्य या वापराकरीता असणाऱ्या भाडेकरु/ रहिवाशांना संक्रमण शिबिर तसेच मंडळामार्फत उपलब्ध असणाऱ्या रु. २०,०००/- भाडयाची पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. आपणास (केवळ रहिवाशी वापर असणारे भाडेकरु / रहिवाशी) यांना पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील गाळयाची आवश्यकता असल्यास या कार्यालयास खालील नमुद कागदपत्रांच्या मुळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतीचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०८ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबिरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल. तसेच आपणास संक्रमण गाळा नको असल्यास अथवा

उपलब्ध नसल्यास भाडेकरु / रहिवाशी यांनी त्यांच्या स्तरावर वास्तव्याची पर्यायी व्यवस्था केल्यास मंडळामार्फत निवासी गाळयांकरीता प्रती माह रु. २०,०००/- भाडे अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | भाडेपावती -दि.१३.०६.१९९६ पुर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळयाशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २. | शिधापत्रिका- दि.१३.०६.१९९६ पुर्वीची | |
| ३. | निवडणूक ओळखपत्र- दि.१३.०६.१९९६ पुर्वीचे | |
| ४. | विदयुत देयक- दि.१३.०६.१९९६ पुर्वीची व सध्याचे | |
| ५. | दूरध्वनी देयक- दि.१३.०६.१९९६ पुर्वीची व सध्याचे | |
| ६. | पारपत्र/वाहन चालक परवाना, इ. | |
| ७. | इमारतीतील वास्तव्याचे इतर पुरावे | |

उपरोल्लेखीत बाबींची पुर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासीत करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी. आपणास विषयांकित उपकर प्राप्त इमारतीच्या अति धोकादायकं अवस्थेबददल व तातडीने इमारत खाली करुन स्थलांतरीत होणेबाबत वारंवार कळविण्यात येत आहे. त्यामुळे काही अपघात घडून हानी झाल्यास मुं.इ.दु. व पु.मंडळ व त्यांचे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

कार्यकारी अभियंता ग-दक्षिण विभाग,
मुं.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई.

प्रत, मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई यांस माहितीस्तव सविनय सादर
प्रत, मा. उपमुख्य अभियंता/परि-२/मुं.इ.दु.व पु.मंडळ, ताडदेव, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत, उपमुख्य अधिकारी/संगा/मुं.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी रवाना.
मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी रवाना.
सहायक आयुक्त, ग-द विभाग व ग-उत्तर विभाग, मनपा यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
वरीष्ठ पोलिस निरीक्षक, दादर पोलिस ठाणे, मुंबई यांस माहितीस्तव रवाना.
इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी.
इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमुद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोकाच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीसीच्या प्रती पंचनाम्यासहीत इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहे.